ePaper
अखेर युद्ध समाप्त होणार? होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याचा इराणचा प्रस्ताव



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™




पान 3 वरुन...
गणेशम फेज-२ दुर्घटनेनंतर अग्निसुरक्षेचा भडका!

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 23 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ९६% UPI व्यवहार पूर्णपणे मोफत; NPCI ने केलं स्पष्ट

# व्यवसायिकांनो घाबरू नका!




### GST कौन्सिलच्या बैठकीकडे लक्ष

वार्षिक ४० लाख रुपयांपेक्षा कमी उलाढाल असणारे पण महिन्याला १ लाख रुपयांपेक्षा जास्त UPI स्वीकारणारे काही अनिबंधीत (UNREGISTERED) छोटे व्यापारी या कक्षेत येऊ शकतात. मात्र, अशा दुकानदारांची संख्या अत्यंत नगण्य असून GST कौन्सिल यावर योग्य निर्णय घेईल, असे सरकारी सूत्रांनी सांगितले आहे.

### ९६ टक्के UPI व्यवहार पूर्णपणे मोफत

NPCI ने स्पष्ट केले की, नव्या नियमांनुसार २,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या 'पर्सन-टू-मर्चंट' (P2M) व्यवहारांवरच मर्चंट डिस्काउंट रेट (MDR) लागू होतो. एकूण UPI व्यवहारांपैकी अशा व्यवहारांचे प्रमाण अवघे ४ टक्के आहे. याचाच अर्थ, दुकानदारांना मिळणाऱ्या तब्बल ९६ टक्के UPI व्यवहारांवर कोणताही मर्चंट चार्ज लागू होत नाही, त्यामुळे त्यावर GST लागण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**₹२,०००पेक्षा जास्त रकमेच्या UPI व्यवहारांवर १८ टक्के GST लागू होणार असल्याच्या चर्चेमुळे दुकानदार आणि व्यापाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI)ने या चर्चेवर स्पष्टीकरण देत संपूर्ण UPI व्यवहाराच्या रकमेवर १८ टक्के GST आकारला जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. लागू होणाऱ्या मर्चंट डिस्काउंट रेट (MDR) शुल्कावरच १८ टक्के GST आकारला जाणार आहे.**

नव्या व्यवस्थेनुसार ₹२,०००पेक्षा जास्त रकमेच्या पात्र 'पर्सन-टू-मर्चंट' (P2M) UPI व्यवहारांवर MDR लागू होणार आहे. मात्र, एकूण UPI व्यवहारांपैकी अशा व्यवहारांचे प्रमाण केवळ सुमारे चार टक्के आहे. त्यामुळे तब्बल ९६ टक्के UPI व्यवहारांवर MDR लागू होणार नाही.

₹२,०००पेक्षा जास्त रकमेचे UPI पेमेंट केले म्हणून ग्राहकाला त्या संपूर्ण रकमेवर १८ टक्के GST भरावा लागणार नाही. MDR हे व्यापाऱ्याशी संबंधित शुल्क आहे. उदाहरणार्थ, ₹१० हजारांच्या पात्र व्यवहारावर ०.४ टक्के MDR लागू झाल्यास ₹४० शुल्क होईल. त्यावर १८ टक्के GST म्हणजे ₹७.२० आकारले जातील. म्हणजेच ₹१० हजारांच्या व्यवहारावर ₹१,८०० GST आकारला जाणार नाही.

### लहान दुकानदारांवर कोणताही बोजा नाही

ज्या व्यापाऱ्यांचे मासिक UPI कलेक्शन १ लाख रुपयांपेक्षा कमी आहे, त्यांना MDR मधून पूर्णपणे सूट देण्यात आली आहे. त्यामुळे लहान व्यापारी, भाजी विक्रेते आणि छोट्या दुकानांना या कराचा कोणताही फटका बसणार नाही.

महिन्याला ₹१ लाखांपर्यंत UPI व्यवहार स्वीकारणाऱ्या छोट्या विक्रेत्यांना MDRमधून सूट देण्यात आली आहे. त्यामुळे लहान दुकानदार, भाजी विक्रेते आणि छोट्या व्यावसायिकांवर या शुल्काचा थेट परिणाम होणार नसल्याचे NPCI ने स्पष्ट केले आहे. तसेच काही विशिष्ट श्रेणीतील व्यवहारांसाठी निश्चित MDRची तरतूद करण्यात आली आहे.




दरम्यान, वार्षिक उलाढाल कमी असलेल्या मात्र मोठ्या प्रमाणावर UPI व्यवहार स्वीकारणाऱ्या काही छोट्या व्यापाऱ्यांबाबत कररचनेविषयी प्रश्न उपस्थित झाले आहेत. या संदर्भात GST कौन्सिलकडून योग्य निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी माहिती देण्यात आली आहे.


NPCIच्या स्पष्टीकरणामुळे '₹२,०००पेक्षा जास्त UPI व्यवहार केला की थेट १८ टक्के GST भरावा लागेल' हा गैरसमज दूर झाला आहे. व्यापाऱ्यांनी आपल्या बँक स्टेटमेंट आणि पेमेंट नोंदी नियमित तपासून MDR व त्यावरील GSTची योग्य नोंद ठेवावी, असा सल्लाही तज्ज्ञांनी दिला आहे.

### तज्ज्ञांचा सल्ला : हिशोब अचूक ठेवा

व्यावसायिक सल्लागार कंपनी DHC चे संस्थापक आणि अध्यक्ष दिलीप बी. देसाई यांच्या मते, "लहान व मध्यम उद्योजकांनी आपल्या बँक स्टेटमेंट आणि पेमेंट गेटवेच्या नोंदी नियमित तपासाव्यात. MDR आणि त्यावर लागणारा GST योग्य रीतीने खात्यात नोंदवला गेल्यास भविष्यातील तांत्रिक अडचणी टाळता येतील."

# नवमतदारांना नोंदणी ३० सप्टेंबरपर्यंतच

## SIR प्रक्रियेमुळे ऑक्टोबरपासून संगणक प्रणाली तात्पुरती बंद होणार



**महाईन्यूज । पुणे**

**वयाची अठरा वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांना मतदारनोंदणी तीस सप्टेंबरपर्यंतच करता येणार आहे. ऑक्टोबर महिन्यापासून मतदार विशेष पुनरीक्षण मोहिमेची (एसआयआर) सुनावणी होणार असल्यामुळे नवमतदार नोंदणीला तात्पुरती स्थगिती देण्यात येणार आहे. जिल्ह्यात ९० लाख असलेली मतदारांची संख्या 'एसआयआर' मोहिमेत २८ लाखांनी घटल्याने पुणे शहर, पिंपरी चिंचवड तसेच जिल्ह्यातील १३ तालुक्यांसह जिल्ह्याची मतदारसंख्या ही ६२ लाख एवढी झाली आहे. त्यातील काही स्थलांतरांची नावे किंवा नवमतदारांची नावे नव्याने समाविष्ट होऊन मतदारसंख्येत वाढ होईल, असा जिल्हा निवडणूक शाखेचा अंदाज आहे.**

'एसआयआर' मोहिमेंतर्गत सध्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदारयादीवर हरकती आणि सूचना येत्या ३० सप्टेंबरपर्यंत नोंदविता येणार आहेत. त्यानंतर या हरकती आणि सूचनांवरील सुनावणी प्रक्रिया ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. त्यानुसार तक्रारी करण्यात आलेल्या मतदारांच्या सुनावण्याचे घेण्याचे नियोजन जिल्हा निवडणूक शाखेने केले आहे. त्यामुळे नवमतदारांच्या नोंदणी येत्या तीस सप्टेंबरपर्यंतच करता येणार असल्याची माहिती निवडणूक शाखेकडून देण्यात आली.

जिल्ह्यातील मतदारसंघातील मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याशी (बीएलओ) संपर्क साधून त्यांच्यामार्फत नवमतदारांनी अर्ज दाखल करावा. नवमतदारांना ऑफलाइन किंवा ऑनलाइन अर्ज दाखल करता येणार आहे. अर्ज दाखल करताच त्याची पोचपावती देखील उपलब्ध होणार आहे. त्यामुळे त्या आधारे नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी पुढील प्रक्रियेसाठी पाठपुरावा करता येणार आहे. अर्ज भरताच दहा दिवसांत त्याला तत्काळ मंजुरी देण्यात येणार आहे. त्यांचीच नावे मतदारयादीत समाविष्ट करण्यात येतील. त्यानंतर 'एसआयआर' मोहिमेची पुढील प्रक्रिया सुरू असणार असल्याने नवमतदारांच्या अर्जांची नोंदणी करून घेण्यासाठी संगणक प्रणाली तात्पुरती स्वरुपात बंद करण्यात येईल. त्यामुळे नवमतदारांनी ३० सप्टेंबरपर्यंत सहा क्रमांकाचा अर्ज भरावा, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी दिली. नवमतदारांच्या नोंदणी ही निरंतर प्रक्रिया असून अंतिम मतदार यादीपूर्वी अर्ज दाखल केल्यास त्यांच्याही नावाची मतदारयादीत समावेश होऊ शकतो, असेही जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

# 'सोमेश्वर' कारखान्याच्या अहवालात पार्थ पवारांना स्थान नाही






**महाईन्यूज । पुणे**

**सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या अहवालात खासदार पार्थ पवार यांचे छायाचित्र किंवा नामोल्लेख नसल्याची बाब प्रचारामध्ये विरोधकांनी निदर्शनास आणून दिल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षावर नामुष्की ओढवली आहे. कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांनी अनवधानाने ही बाब घडल्याचे स्पष्टीकरण दिले असले, तरी विरोधकांनी हा मुद्दा घेऊन प्रचार सुरू केल्याने 'राष्ट्रवादी'ची अडचण झाली आहे.**

सोमेश्वर कारखान्याच्या निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात झाली आहे. कारखान्याच्या अहवालात खासदार पार्थ पवार यांचे छायाचित्र नसल्यावरून शेतकरी कृती समितीचे नेते सतीश काकडे यांनी टीका केली. 'कारखान्याच्या विद्यमान अध्यक्षांना पार्थ पवार यांचे छायाचित्र अहवालात घेणे लज्जास्पद वाटत असावे किंवा ते त्यांच्यापेक्षा कमी वयाचे असल्याने छायाचित्र अहवालात नसावे,' असा आरोप काकडे यांनी केला. त्यावर कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांनी नजरचुकीने ही बाब घडल्याचे स्पष्टीकरण दिले आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पद्धतीवरूनही काकडे यांनी जगताप यांना लक्ष्य केले. ते म्हणाले, की पहिल्याच दिवशी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर शेवटच्या दिवशी गाड्यांचा ताफा घेऊन शक्तिप्रदर्शन करण्याची गरज काय होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतरही अशा प्रकारचे शक्तिप्रदर्शन करणे योग्य आहे का, असा सवाल काकडे यांनी केला आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मारकासाठी कारखान्याच्या सभासदांकडून प्रतिटन ५० रुपये भागविकास निधीतून देण्याच्या प्रस्तावाला एकमताने मंजुरी देण्यात आली. कारखान्याच्या ६२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत हा निर्णय घेण्यात आला. या सभेत कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांनी अहवालात खासदार पार्थ पवार यांचे छायाचित्र समाविष्ट करणे अनवधानाने राहिल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. या मुद्द्याचे काही जणांकडून राजकारण करण्यात आल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. सभासदांना प्रतिटन ११ हजार रुपये दर देण्याचे सभेत जाहीर करण्यात आले.

### समाजमाध्यमात निनावी पत्र

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना उद्देशून समाजमाध्यमात एक निनावी पत्र प्रसारित झाले आहे. त्या पत्रात सोमेश्वर कारखान्याच्या राजकीय घडामोडींवर भाष्य करण्यात आले आहे. कारखान्याच्या अहवालात पार्थ पवार यांचे छायाचित्र किंवा नामोल्लेख नसल्याचा मुद्दा त्यात उपस्थित केला आहे. पवार कुटुंबाला बाजूला करण्याचा प्रयत्न होत आहे का, असा सवालही पत्रातून करण्यात आला आहे.

# गणेशम फेज-२ दुर्घटनेनंतर अग्निसुरक्षेचा भडका!

## महापालिका प्रशासनाला शत्रुघ्न काटेंचे खडेबोल; अत्याधुनिक हायड्रोलिक शिड्यांची मागणी

**महाईन्यूज I पिंपरी-चिंचवड**

**पिंपळे सौदागर येथील ‘गणेशम फेज-२’ सोसायटीमध्ये १८ सप्टेंबर २०२६ रोजी घडलेल्या भीषण आगीच्या घटनेनंतर शहरातील अग्निसुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या दुर्घटनेत महापालिकेच्या अग्निशमन यंत्रणेतील त्रुटी आणि प्रशासकीय नियोजनाचा अभाव समोर आल्याचा आरोप करीत भारतीय जनता पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी महापालिका आयुक्तांना कडक शब्दांत लेखी निवेदन दिले आहे.**




शहरातील वाढत्या गगनचुंबी इमारतींचा विचार करून ५० ते ९० मीटर किंवा त्याहून अधिक उंचीपर्यंत पोहोचणाऱ्या अत्याधुनिक हायड्रोलिक शिड्या तातडीने खरेदी कराव्यात, अग्निशमन दलातील सर्व साधनसामग्रीचे ‘सेफ्टी ऑडिट’ करावे आणि शहरातील सोसायट्यांच्या ‘फायर ऑडिट’ची सद्यस्थिती सात दिवसांत सार्वजनिक करावी, अशी मागणी काटे यांनी केली आहे.

‘गणेशम फेज-२’ सोसायटीतील आगीदरम्यान एका बंद सदनिकेत दोन लहान मुली अडकून पडल्या होत्या. त्यांचा जीव धोक्यात असताना अग्निशमन दलाकडील अपुरी व नादुरुस्त उपकरणे तसेच बचावकार्याच्या नियोजनातील त्रुटींमुळे मोहिमेत गंभीर अडथळे निर्माण झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात २० ते ३० मजल्यांच्या उंच इमारती मोठ्या प्रमाणावर उभ्या राहत आहेत. मात्र, एवढ्या उंचीपर्यंत पोहोचू शकणाऱ्या आधुनिक हायड्रोलिक शिड्या आणि आवश्यक बचाव उपकरणे महापालिकेकडे उपलब्ध नसणे ही धक्कादायक आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर बाब असल्याचे काटे यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले.

> “पिंपरी-चिंचवडमधील प्रत्येक नागरिकाचा आणि लहान मुलांचा जीव अत्यंत मोलाचा आहे. केवळ इमारतींना मंजुरी देणे आणि करवसुली करणे एवढ्यापुरती महापालिकेची जबाबदारी मर्यादित नाही; नागरिकांच्या सुरक्षिततेची हमी देणेही प्रशासनाचे कर्तव्य आहे. ‘गणेशम फेज-२’मधील घटना ही प्रशासनासाठी शेवटची धोक्याची घंटा समजावी. येत्या आठ ते दहा दिवसांत ठोस पावले उचलावीत.”
>
> - शत्रुघ्न (बापू) काटे, शहराध्यक्ष, भाजपा पिंपरी-चिंचवड शहर.

### शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या प्रमुख मागण्या

अत्याधुनिक हायड्रोलिक शिड्यांची खरेदी : ५० ते ९० मीटर किंवा त्यापेक्षा अधिक उंचीपर्यंत पोहोचणाऱ्या आंतरराष्ट्रीय मानकांच्या हायड्रोलिक शिड्या आणि ‘ब्रोंटो स्कायलिफ्ट’सारखे आधुनिक प्लॅटफॉर्म अग्निशमन दलाच्या ताफ्यात तातडीने समाविष्ट करावेत., सात दिवसांत फायर ऑडिट अहवाल : शहरातील किती सोसायट्यांचे फायर ऑडिट पूर्ण झाले, किती ठिकाणी अग्निसुरक्षेच्या त्रुटी आढळल्या आणि किती सोसायट्यांना नोटिसा बजावण्यात आल्या, याचा विभागनिहाय सविस्तर अहवाल सार्वजनिक करावा., अग्निशमन यंत्रणेचे सेफ्टी ऑडिट : अग्निशमन दलातील सर्व वाहने, पंप, ऑक्सिजन मास्क, शिड्या आणि बचाव उपकरणांची तातडीने तपासणी करावी. कालबाह्य व नादुरुस्त साहित्य वापरातून काढून त्याऐवजी अत्याधुनिक साधनसामग्री उपलब्ध करून द्यावी., आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण आणि मॉकड्रिल : अग्निशमन जवानांना उंच इमारतींमधील आपत्कालीन बचावकार्याचे विशेष प्रशिक्षण द्यावे. शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये नियमित अग्निसुरक्षा जनजागृती आणि मॉकड्रिल आयोजित कराव्यात., आठ ते दहा दिवसांत ठोस कारवाईची मागणी : महापालिका प्रशासनाने या मागण्यांची गंभीर दखल घेऊन येत्या आठ ते दहा दिवसांत ठोस उपाययोजना सुरू कराव्यात. अन्यथा नागरिकांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नावर भाजप अधिक आक्रमक भूमिका घेईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

# तक्रारी नाही, थेट कृती! प्रभाग ८ मध्ये विकासकामांचा धडाका

**महाईन्यूज I पिंपरी-चिंचवड**

**नागरिकांच्या सूचनांना प्राधान्य देत प्रभाग क्र. ८ मधील विविध नागरी समस्या सोडविण्यासाठी शहर सुधारणा समिती सदस्य तथा नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी पुढाकार घेतला आहे. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून मोशी प्राधिकरण, बालाजीनगर आणि स्पाइन रोड परिसरात विविध विकासकामे वेगाने सुरू आहेत.**




मोशी प्राधिकरण परिसरात खराब झालेले पेव्हिंग ब्लॉक दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसह परिसराचे सौंदर्य आणि रस्त्यांची गुणवत्ता कायम राखण्याच्या दृष्टीने आवश्यक ठिकाणी पेव्हिंग ब्लॉकची पुनर्बांधणी करण्यात येत आहे.

बालाजीनगर परिसरातील जुन्या ड्रेनेज लाईनमुळे नागरिकांना निर्माण होणाऱ्या समस्यांची दखल घेत नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. परिसरातील सांडपाण्याचा निचरा सुरळीत व्हावा, स्वच्छता टिकून राहावी आणि भविष्यात नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी जुनी व्यवस्था बदलून सक्षम नवीन यंत्रणा उभारली जात आहे.

> “आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महापालिका प्रशासनाच्या सहकार्याने प्रभाग क्र. ८ मधील प्रत्येक नागरी समस्या प्राधान्याने सोडविण्याचा आमचा प्रयत्न आहे. नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा देणे, सुरक्षित व खड्डेमुक्त रस्ते उपलब्ध करून देणे आणि स्वच्छ, विकसित प्रभाग घडविणे ही आमची कटिबद्धता आहे. नागरिकांच्या सूचनांवर तत्काळ कृती करून विकासकामांचा दर्जा व गती कायम ठेवली जाईल.”
>
> - डॉ. सुहास कांबळे, सदस्य, शहर सुधारणा समिती, नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

### खड्डेमुक्त परिसरासाठी प्रयत्न...

तसेच, मोशी प्राधिकरण आणि स्पाइन रोड परिसरातील रस्त्यांवर पडलेले खड्डे डांबरीकरण करून बुजविण्यात आले आहेत. त्यामुळे वाहनचालकांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुलभ होणार असून, वाहतुकीतील अडथळे कमी होण्यास मदत होणार आहे. प्रभागातील नागरिकांनी मांडलेल्या समस्या केवळ नोंदवून न ठेवता त्यावर तत्काळ कार्यवाही करण्यावर डॉ. सुहास कांबळे यांनी भर दिला आहे. दर्जेदार मूलभूत सुविधा, सुरक्षित रस्ते, सक्षम ड्रेनेज व्यवस्था आणि स्वच्छ परिसर या उद्दिष्टांसाठी महापालिका प्रशासनाशी सातत्याने समन्वय साधला जात आहे. “नागरिकांची सूचना, आमची कृती” हा दृष्टिकोन केंद्रस्थानी ठेवून प्रभाग क्र. ८ च्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम सुरू असल्याचे डॉ. कांबळे यांनी स्पष्ट केले.



## भूमिका

**विकासाला वेग हवा आणि पर्यावरणाचे संरक्षणही हवे, या दोन गरजांमध्ये भारताची विकासकथा अनेक वर्षांपासून समतोल साधण्याचा प्रयत्न करीत आहे. पर्यावरण मंजुरीची प्रक्रिया अधिक वेगवान आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने केलेल्या उपाययोजनांमुळे ही प्रक्रिया सरासरी ५७ दिवसांपर्यंत आल्याचे सांगितले जात आहे.**

# वेगवान विकास, पण निसर्गाच्या मुळावर घाव नको!



डिजिटल प्रक्रिया, तिमाही आढावा, राज्यस्तरीय तज्ज्ञ समित्यांच्या कामाचा मागोवा आणि अनावश्यक पुनरावृत्ती टाळण्यावर भर दिला जात आहे.

उद्योग आणि पायाभूत सुविधा क्षेत्राच्या दृष्टीने हे निश्चितच महत्त्वाचे पाऊल आहे. मोठा प्रकल्प मंजुरीच्या प्रतीक्षेत राहिला की भांडवल अडकते, कर्जाचा खर्च वाढतो, बांधकामाचे वेळापत्रक विस्कटते आणि रोजगारनिर्मितीलाही विलंब होतो. त्यामुळे पर्यावरण मंजुरीच्या नावाखाली फाइल महिने-महिने प्रलंबित ठेवणे हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे लक्षण ठरू शकत नाही. पारदर्शक, डिजिटल आणि वेळबद्ध प्रक्रिया उद्योगांना निश्चितता देते. महाराष्ट्रासारख्या औद्योगिक आणि पायाभूत सुविधांच्या विस्ताराला वेग देणाऱ्या राज्यासाठी तर त्याचे महत्त्व अधिक आहे. मात्र, पर्यावरण मंजुरी ही केवळ प्रशासकीय औपचारिकता नाही. ती एखाद्या प्रकल्पामुळे होणारे संभाव्य नुकसान आधी ओळखण्याची सुरक्षा यंत्रणा आहे. नदीवर धरण, समुद्रकिनारी बंदर, जंगलालगत महामार्ग, पाणथळ जागेवर बांधकाम किंवा भूजलावर मोठा उद्योग उभारताना त्याचा परिणाम केवळ प्रकल्पाच्या जागेपुरता मर्यादित राहत नाही. पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बदलतो, अधिवास नष्ट होतात, भूजलावर ताण येतो आणि पूर किंवा प्रदूषणाचा धोका वाढू शकतो.

महाराष्ट्रात मुंबई, नवी मुंबई, पालघर, रायगड, पुणे, नाशिक आणि कोल्हापूरसारख्या भागांमध्ये विकासाचा पर्यावरणावर होणारा परिणाम विशेष संवेदनशील आहे. खाड्या, कांदळवने, नद्या, पाणथळ जागा, डोंगरउतार आणि जलस्रोत यांच्यावर वाढता दबाव आहे. अशा वेळी मंजुरीचा वेग वाढवताना परीक्षणाची गुणवत्ता कमी होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. खरा प्रश्न '५७ दिवसांत किती मंजुरी दिल्या?' हा नाही; तर '५७ दिवसांत किती सक्षम पर्यावरणीय परीक्षण झाले?' हा आहे. कागदपत्रे पूर्ण असतील, परिणामांचा अभ्यास पुरेसा असेल आणि सार्वजनिक हरकतींचा विचार झाला असेल तर अनावश्यक विलंब टाळलाच पाहिजे. पण केवळ कालमर्यादा पूर्ण करण्यासाठी त्रुटी असलेल्या प्रकल्पाला मंजुरी देणे म्हणजे भविष्यातील संकटाला निमंत्रण देणे होय.

विकास आणि पर्यावरण हे परस्परविरोधी नाहीत. संघर्ष दिरंगाई आणि कार्यक्षमतेमध्ये आहे. कमी जोखमीच्या प्रकल्पांना अनावश्यक विलंब नको; मात्र पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील प्रकल्पांची तपासणी अधिक काटेकोर हवी. वेगवान मंजुरी हवीच; पण घाईची पर्यावरणीय मंजुरी नको. विकासाची घड्याळे वेगाने चालू देत; निसर्गाची किंमत मोजून नव्हे.

## प्रासंगिक »

### खरा आधार

**एका गावात विठ्ठल नावाचा कुंभार राहत होता. तो मेहनती आणि प्रामाणिक होता. एकदा त्याने बाजारात विकण्यासाठी मातीची सुंदर भांडी तयार केली. भांडी घेऊन तो बाजाराकडे निघाला. वाटेत त्याची गाडी एका खड्ड्यात अडकली.**

त्याने खूप प्रयत्न केले, पण गाडी बाहेर निघेना. तेवढ्यात तिथून एक श्रीमंत व्यापारी घोडागाडीने जात होता. विठ्ठलने मदत मागितली. व्यापाऱ्याने त्याच्याकडे पाहिले आणि म्हणाला, "माझ्याकडे वेळ नाही," असे सांगून तो पुढे निघून गेला.

काही वेळाने एक गरीब मजूर तिथून जात होता. विठ्ठलने त्यालाही मदत मागितली. मजुराने स्वतःची कामाची घाई बाजूला ठेवली आणि गाडी ढकलण्यास सुरुवात केली. त्याच्या प्रयत्नाने गाडी बाहेर आली. विठ्ठलने त्याचे मनापासून आभार मानले.

काही दिवसांनी त्या मजुराच्या घरातील लग्नासाठी भांड्यांची गरज होती. विठ्ठलने त्याला सर्व भांडी विनामूल्य दिली. मजूर भावूक झाला. तेव्हा विठ्ठल म्हणाला, "मदतीची किंमत पैशांत नसते; योग्य वेळी दिलेला आधार आयुष्यभर लक्षात राहतो."

- तात्पर्य : **अडचणीच्या वेळी केलेली मदतच खरी माणुसकी दाखवते.**

रशियाकडून मोठ्या प्रमाणावर तेल आणि वायू खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क लावण्याचा अधिकार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना देणारा कायदा १८ सप्टेंबर २०२६ रोजी लागू झाला.

# टॅरिफच्या दंडुक्यापुढे भारताची कसोटी

या कायद्याचा थेट परिणाम भारत आणि चीनसारख्या रशियन ऊर्जेचे मोठे खरेदीदार असलेल्या देशांवर होऊ शकतो. मात्र, कोणत्या देशांवर प्रत्यक्ष शुल्क लावले जाईल, याबाबत अद्याप काही बाबी स्पष्ट नाहीत.



भारतासाठी हा विषय केवळ परराष्ट्र धोरणाचा नाही, तर ऊर्जा आणि आर्थिक सुरक्षेचाही आहे. रशियाकडून स्वस्त कच्चे तेल मिळाल्यामुळे भारतीय शुद्धीकरण उद्योगाला आणि देशाच्या ऊर्जा व्यवस्थेला महत्त्वाचा आधार मिळाला आहे. दुसरीकडे, अमेरिकेची बाजारपेठ भारतीय निर्यातदारांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे रशियन तेल खरेदी आणि अमेरिकन बाजारपेठ यांच्यातील समतोल भारतासाठी गुंतागुंतीचा ठरू शकतो. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, भारताच्या एकूण तेलपुरवठ्यात रशियन कच्च्या तेलाचा वाटा २०२६ मध्ये ४० टक्क्यांहून अधिक राहिला आहे.

या परिस्थितीत केवळ राजनैतिक प्रतिक्रिया देऊन प्रश्न सुटणार नाही. भारताने ऊर्जा स्रोतांचे अधिक वैविध्यीकरण करणे, दीर्घकालीन पुरवठा करार वाढवणे आणि तेलाच्या किमतीतील अचानक बदलांचा परिणाम कमी करण्यासाठी धोरणात्मक साठ्यांची क्षमता मजबूत करणे आवश्यक आहे. एकाच स्रोतावर मोठे अवलंबित्व कोणत्याही देशासाठी जोखमीचे असते.

त्याचबरोबर निर्यात बाजारपेठांचेही विविधीकरण महत्त्वाचे ठरते. अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी भारताने ब्रिटन, युरोपीय संघ, न्यूझीलंड आणि इतर अर्थव्यवस्थांशी व्यापार संबंध विस्तारण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. भारत-न्यूझीलंड मुक्त व्यापार करार २० ऑक्टोबरपासून लागू होणार असल्याचे नुकतेच जाहीर झाले आहे.

डॉलरच्या वर्चस्वाला पर्याय उभा करणे हा दीर्घकालीन विषय आहे. रुपयातील व्यापार, स्थानिक चलनांमधील व्यवहार आणि पर्यायी वित्तीय यंत्रणा यांचा वापर वाढविण्याची चर्चा होत असली, तरी त्यासाठी स्थिर, विश्वासार्ह आणि मोठ्या प्रमाणावर वापरता येतील अशा व्यवस्था उभाराव्या लागतील.

अमेरिकेच्या टॅरिफ धोरणामुळे जागतिक व्यापारातील अनिश्चितता वाढत असताना भारतासमोरची खरी गरज कोणत्याही एका देशाशी संघर्ष करण्याची नसून स्वावलंबी आणि विविध स्रोतांवर आधारित आर्थिक व्यवस्था उभारण्याची आहे. ऊर्जा, व्यापार, वित्त आणि पुरवठा साखळी या सर्व क्षेत्रांत पर्याय जितके अधिक, तितका बाह्य दबावाचा परिणाम कमी करता येईल. बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारताची आर्थिक सुरक्षितता प्रतिक्रियेत नव्हे, तर आधीच केलेल्या तयारीत दडलेली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



भोगें घडे त्याग ।
त्यागें अंगा येती भोग ॥१॥

ऐसें उफराटें वर्म ।
धर्मा अंगीं च अधर्म ॥ध्रु.॥

- **संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.)
विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महामार्गांवर १०० नवीन रुग्णवाहिका

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गासह समृद्धी महामार्गावर तैनाती; एअर ॲम्ब्युलन्सचाही विचार

**महाईन्यूज । मुंबई**

**रस्ते अपघातात देशात राज्याचा तिसरा क्रमांक लागतो. अपघाती मृत्यू आणि जखमींचे प्रमाण कमी करण्यासह अपघातग्रस्तांना गोल्डन अवरमध्ये वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी परिवहन विभागाने राज्यातील अपघात प्रवण ठिकाणे, महामार्गावर १०० नवीन रुग्णवाहिका तैनात करण्याची योजना आखली आहे. रस्ते सुरक्षा निधीतून या रुग्णवाहिका खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.**



राज्यात दरवर्षी सुमारे ३५ हजारांपेक्षा जास्त रस्ते अपघात होतात. त्यात सुमारे १५ हजार जणांचा जीव गमवावा लागतो. तर हजारो जखमी होतात. अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळण्याची आवश्यकता असते. मात्र अनेकदा महामार्ग, ग्रामीण – दुर्गम भागात अपघात ग्रस्तांना तात्काळ रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्याने वैद्यकीय उपचार मिळण्यात विलंब होतो. वैद्यकीय उपचार वेळेत मिळाले नसल्याने अपघातातील जखमींचा जीव जातो. त्यामुळे रस्ते अपघातांसाठी आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने परिवहन विभागाने नवीन १०० रुग्णवाहिका घेण्याचा निर्णय घेतला आहे.

सध्या, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या रुग्णवाहिका बेसिक लाईफ सपोर्ट आणि ॲडव्हान्स्ड लाईफ सपोर्ट सेवा पुरवतात. प्रस्तावित परिवहन विभागाचे नेटवर्क अपघातस्थळी त्वरित पोहोचणे, तात्काळ प्रथमोपचार देणे, पीडितांना जवळच्या रुग्णालयात किंवा ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यावर लक्ष केंद्रित करणार आहे. अपघातांची संख्या, अपघातप्रवण क्षेत्रे, प्रतिसादासाठी लागणारा वेळ आणि जवळच्या ट्रॉमा केअर सुविधेपासूनचे अंतर या बाबी विचारात घेऊन रुग्णवाहिकांसाठीची ठिकाणे निश्चित केली जाणार आहेत. रुग्णवाहिका अशा ठिकाणी तैनात करणे, जिथून त्या शक्य तितक्या कमी वेळेत अपघातस्थळी पोहोचू शकतील, हा यामागील उद्देश आहे.

मुंबई- पुणे द्रुतगती मार्ग, समृद्धी महामार्ग आणि कोकण भागातील प्रमुख महामार्ग, तसेच दुर्गम आणि आदिवासी भागांतील अपघातप्रवण पट्ट्यांचा समावेश.

गंभीररित्या जखमी अपघातग्रस्तांसाठी हवाई रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याच्या शक्यतेचीही तपासणी सुरू आहे. या सेवेसाठी व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी एका सल्लागाराची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव आहे.

### रुग्णवाहिकेच्या दरात बदल होणार?

राज्य सरकार रुग्णवाहिकेच्या शुल्कासाठी नवीन धोरण आखत आहे. इंधन, देखभाल, वैद्यकीय उपकरणे, पार्किंग आणि कर्मचाऱ्यांचे पगार यांमधील वाढता खर्च लक्षात घेता, २०२० मध्ये निश्चित केलेल्या सध्याच्या भाडे रचनेत सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे.मारुती व्हॅनसाठी सध्याचे मूळ भाडे ७०० रुपये आणि प्रति किमी १० रुपये, टाटा सुमो / मॅटाडोरसाठी ८४० मूळ भाड्यासह प्रति किमी १० रुपये, टाटा ४०७ साठी ९८० रुपये मूळ भाडे आणि प्रति किमी १४ रुपये आकारण्यात येतात. तर एसी / आयसीयू रुग्णवाहिकांसाठी १,१९० रुपये मूळ भाडे असून प्रति किमी १७ रुपये दर आहे.

# वैशाली रावळ यांना कराड तालुकास्तरीय 'आदर्श शिक्षक पुरस्कार'

**महाईन्यूज । कराड**

**कराड तालुका पंचायत समितीच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी देण्यात येणाऱ्या तालुकास्तरीय 'आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी' जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, इंदोली येथील उपक्रमशील शिक्षिका सौ. वैशाली राजीव रावळ यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे इंदोली केंद्रासह शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.**



विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे आणि शालेय उपक्रम प्रभावीपणे राबविणे यासाठी सौ. रावळ यांनी मोलाचे योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक क्षमतांचा विचार करून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्याबरोबरच त्यांच्यात आत्मविश्वास, शिस्त, संस्कार आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

बदलत्या शैक्षणिक गरजांनुसार अध्यापन अधिक रंजक व परिणामकारक करण्यावर त्यांनी भर दिला. शाळेतील विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत विद्यार्थ्यांना स्वतःची गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालकांशी नियमित संवाद साधत शाळा आणि समाज यांच्यातील संबंध अधिक दृढ करण्यासाठीही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

सौ. वैशाली रावळ यांच्या कार्याची दखल घेत कराड तालुका पंचायत समितीने त्यांची सन २०२६-२७ च्या 'आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी' निवड केली. हा पुरस्कार त्यांच्या निष्ठापूर्ण शैक्षणिक सेवेला मिळालेली गौरवपूर्ण पावती असल्याची भावना शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

या निवडीमुळे जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, इंदोलीच्या लौकिकात भर पडली असून शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सौ. रावळ यांच्यावर शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, सहकारी शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, इंदोलीच्या वतीने सौ. वैशाली राजीव रावळ यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि सामाजिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

### थोडक्यात परिचय

पुरस्कारप्राप्त शिक्षिका सौ. वैशाली राजीव रावळ यांना तालुका पंचायत समिती, कराड यांच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६-२७ प्रदान करण्यात आला आहे. त्या इंदोली केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, इंदोली येथे कार्यरत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, इंदोली परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा!

# जिंकलो तर ९० फुटी हनुमान मूर्ती हटवू

## टेक्सासमध्ये जेसी ह्यूजेस यांच्या पोस्टवरून वाद, अमेरिकन माजी सैनिकाचा विरोध

महाईन्यूज । बिहार

**अमेरिकेतील टेक्सासमध्ये ९० फूट उंच भगवान हनुमान यांच्या मूर्तीवरून वाद निर्माण झाला आहे. 'MAGA' (मेक अमेरिका ग्रेट अगेन) समर्थक यूट्यूबर जेसी ह्यूजेस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर या मूर्तीचा फोटो शेअर करत, "जेव्हा आम्ही जिंकू, तेव्हा ही मूर्ती हटवू," अशी वादग्रस्त पोस्ट केली. मात्र, "आम्ही जिंकू, तेव्हा..." असे म्हणत असताना ह्यूजेस नेमक्या कोणत्या विजयाचा संदर्भ देत होते, हे त्यांनी अद्याप स्पष्ट केलेले नाही. त्यांच्या या पोस्टनंतर सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. याबद्दल सविस्तर वृत्त हिंदुस्थान टाइम्सने दिले आहे.**



ही मूर्ती टेक्सासमधील शुगर लँड येथील श्री अष्टलक्ष्मी मंदिरात आहे. 'स्टॅच्यु ऑफ युनिअन' या नावाने ओळखली जाणारी ही हनुमान मूर्ती ऑगस्ट २०२४ मध्ये प्रतिष्ठापित करण्यात आली होती. मूर्तीची उंची सुमारे ९० फूट असून, तिच्या प्रतिष्ठापनेपासूनच काही पुराणमतवादी गटांकडून सोशल मीडियावर आक्षेप व्यक्त करण्यात आले आहेत.

ह्यूजेस यांच्या पोस्टनंतर अमेरिकन लष्कराचे माजी सैनिक आणि अमेरिकेत राहणारे भारतीय वंशाचे हिंदू नागरिक रुचिर बक्षी यांनी त्यांना प्रत्युत्तर दिले. बक्षी यांनी म्हटले की, अमेरिकन सैन्यात सेवा बजावताना त्यांनी विविध धर्मांच्या लोकांबरोबर काम केले असून, कोणत्याही धर्माच्या प्रार्थनास्थळाला लक्ष्य करण्यासाठी त्यांनी लष्करी सेवा केली नव्हती.

"मी अमेरिकन लष्करामध्ये सेवा केली, कुटुंबापासून दूर राहिलो आणि युद्धात गेलो, ते माझ्या धर्माला लक्ष्य करण्यासाठी नव्हे," अशा आशयाची भूमिका त्यांनी मांडली. त्यांनी ह्यूजेस यांच्या वक्तव्याला हिंदू धर्मविरोधातील धमकी असे संबोधले.

बक्षी यांनी पुढे सांगितले की, हिंदू-अमेरिकन नागरिक कर भरतात, व्यवसाय चालवतात आणि त्यांची मुलंही अमेरिकन सैन्यात सेवा करतात. त्यामुळे एखाद्या धार्मिक समुदायाच्या प्रार्थनास्थळाला त्याच्या श्रद्धेमुळे लक्ष्य करणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले. त्यांच्या या प्रतिक्रियेला सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

### सोशल मीडियावरही तीव्र प्रतिक्रिया


ह्यूजेस यांच्या पोस्टमुळे सोशल मीडियावर अनेक तीव्र प्रतिक्रिया येत आहेत. अनेक युजर्सनी इतर देशांतील धार्मिक स्थळांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करत या वृत्तीवर ताशेरे ओढले आहेत. 'कोलिशन ऑफ हिंदूज ऑफ नॉर्थ अमेरिका'नेही बक्षी यांच्या भूमिकेला समर्थन दिले आणि सोशल मीडियावर धार्मिक द्वेषाला सामान्य करण्याच्या प्रयत्नांवर चिंता व्यक्त केली.


दरम्यान, ह्यूजेस यांच्या वक्तव्यामुळे सोशल मीडियावर मोठी चर्चा सुरू झाली असून अमेरिकेतील धार्मिक स्वातंत्र्य आणि हिंदू समुदायाच्या धार्मिक स्थळांच्या सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

## गोय राखण यात्रेच्या पार्श्वभूमीवर 'खोका रन'उपरोधिक गेमद्वारे गोवा काँग्रेसवर निशाणा

महाईन्यूज । गोवा

**आगामी गोय राखण यात्रेच्या पार्श्वभूमीवर 'खोका रन' नावाचा एक नवा उपरोधिक डिजिटल गेम ऑनलाइन लॉन्च करण्यात आला आहे. विनोद, उपरोध आणि इंटरॲक्टिव्ह गेमप्लेच्या माध्यमातून गोवा काँग्रेसशी संबंधित राजकीय चर्चेवर भाष्य करण्याचा प्रयत्न या गेममधून करण्यात आला आहे. यात्रेपूर्वी सुरू असलेल्या राजकीय चर्चेला या उपक्रमामुळे एक वेगळा डिजिटल आयाम मिळाला आहे.**




हा गेम गोवा काँग्रेसचे अध्यक्ष गिरीश चोडणकर यांच्या व्यंगचित्रात्मक प्रतिमेवर आधारित असून, संभाव्य आमदारपदाच्या उमेदवारांना पक्षाची तिकिटे विकल्याच्या आरोपांभोवती राज्यातील राजकीय चर्चेत सुरू असलेल्या दाव्यांपासून त्याला प्रेरणा मिळाल्याचे सांगण्यात आले आहे. या आरोपांना विनोदी आणि उपरोधिक पद्धतीने गेमिंगच्या माध्यमातून मांडण्यात आले आहे.

'खोकरून' मध्ये गिरीश चोडणकर यांच्यासारखी दिसणारी व्यंगचित्रात्मक व्यक्तिरेखा श्रीमंत इच्छुकांना निवडणुकीची तिकिटे वाटताना, तर सामान्य पक्ष कार्यकर्त्यांना दूर सारताना दाखवण्यात आली आहे. खेळाडूंना मर्यादित वेळेत जास्तीत जास्त 'तिकिटे' गोळा करण्याचे आव्हान देण्यात आले आहे. सर्वाधिक गुण मिळवणारा खेळाडू लाईव्ह लीडरबोर्डवर अव्वल स्थान मिळवतो. निर्मात्यांनी सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंसाठी साप्ताहिक विशेष बक्षिसांचीही घोषणा केली आहे.

हा गेम 'खोका रन' (KHOKHA RUN) वेबसाइटवर उपलब्ध असून, त्याला '4 KHOKHETICKETOK' या व्यापक उपरोधिक प्लॅटफॉर्मशी जोडण्यात आले आहे. "4 KHOKHE, TICKET OK" या वाक्याशी साधर्म्य असलेले हे नाव असून, गोव्यातील काँग्रेसशी संबंधित पैशांचे व्यवहार, राजकीय तिकीट वाटप आणि जमीनविषयक वादांभोवतीच्या आरोपांचा विनोदी पद्धतीने संदर्भ देण्यात आला आहे.

निर्मात्यांच्या मते, पारंपरिक राजकीय संदेशांऐवजी गेमिंग, विनोद आणि उपरोधाच्या माध्यमातून प्रेक्षकांशी संवाद साधणे हा या उपक्रमामागील उद्देश आहे. नागरिकांना गेममध्ये सहभागी होण्याचे, लीडरबोर्डवरील आव्हानात भाग घेण्याचे आणि या उपरोधिक डिजिटल कंटेंटबाबत आपल्या प्रतिक्रिया ऑनलाइन शेअर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी: 'खोकरून' आणि '4KHOKHETICKETOK' या वेबसाइटला भेट द्या. HTTPS://WWW.4KHOKHE.COM/



# मनोरंजन विश्वावर शोककळा!

१९७० आणि ८० च्या दशकात आपल्या अप्रतिम सौंदर्याने आणि सहज अभिनयाने रुपेरी पडदा गाजवणारी एक दिग्गज अभिनेत्री आता आपल्यात राहिलेली नाही. बंगाली आणि हिंदी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री मिथू मुखर्जी यांनी वयाच्या ७१ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला आहे. गेल्या वर्षभरापासून त्या कर्करोगासारख्या अत्यंत गंभीर आजाराशी एकाकी लढा देत होत्या.

अखेर मुंबईतील एका खासगी रुग्णालयात रविवारी रात्री त्यांची ही झुंज संपली आणि एका चतुरस्त्र अभिनय प्रवासावर कायमचा पडदा पडला. त्यांच्या निधनाची बातमी समोर येताच संपूर्ण भारतीय सिनेसृष्टीवर, विशेषतः बंगाली मनोरंजन विश्वावर दुःखाची गडद सावली पसरली आहे. कोलकाता येथे १९५५ मध्ये जन्मलेल्या मिथू मुखर्जी यांनी वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी चित्रपट जगतात पाऊल ठेवले. चित्ता बोस यांच्या 'शेष पर्व' या चित्रपटातून अभिनयविश्वात पदार्पण करणाऱ्या या अभिनेत्रीला दिनेन गुप्ता यांच्या 'मर्जिना अब्दुल्ला' या सिनेमाने एका रात्रीत लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचवले. त्यानंतर उत्तम कुमार, सौमित्र चट्टोपाध्याय आणि रंजीत मल्लिक यांसारख्या त्या काळातील महानायकांसोबत त्यांनी स्क्रीन शेअर केली. 'निशिकन्या', 'मौचाक', 'कबी', 'हॉटेल स्नो फॉक्स', 'प्रतिमा', 'बंधन', 'प्रार्थना' आणि 'स्वयंसिद्धा' यांसारख्या एकापेक्षा एक सरस चित्रपटांमधून त्यांनी आपल्या अभिनयाची जादू दाखवून स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली होती.

केवळ प्रादेशिक सिनेमांपुरते मर्यादित न राहता त्यांनी बॉलिवूडमध्येही आपल्या अभिनयाचा वेगळा ठसा उमटवला. १९७६ मध्ये दुलाल गुहा यांच्या 'खान दोस्त' चित्रपटातून त्यांनी हिंदीत पदार्पण केले. त्यानंतर प्रसिद्ध दिग्दर्शक बासू चटर्जी यांच्या 'सफेद झूठ', 'दिललगी' आणि 'दो लड़के दोनों कड़के' यांसारख्या लोकप्रिय चित्रपटांमध्ये त्यांनी संस्मरणीय भूमिका साकारल्या. त्यांच्या मनमोहक स्क्रीन प्रेझेन्सचे त्याकाळी मोठे कौतुक झाले होते.

यशाच्या शिखरावर असतानाच १९८० च्या दशकात त्यांनी सिनेसृष्टीपासून काही काळ अंतर राखले. त्यानंतर १९९० मध्ये 'आश्रिता' या चित्रपटातून त्यांनी पुनरागमन केले, पण दुर्दैवाने हाच चित्रपट त्यांच्या अभिनय कारकिर्दीतील अखेरचा ठरला.

# सोनाली बेंद्रेचा कमबॅक!



बॉलीवूडमध्ये आपल्या दमदार अभिनय व सौंदर्याने सर्वांची मने जिंकणारी अभिनेत्री म्हणजे सोनाली बेंद्रे. मराठी कुटुंबातील सोनालीने बॉलीवूडमध्ये अनेक सिनेमांमध्ये काम करीत तिची वेगळी ओळख निर्माण केली. यानंतर तिने दोन दशकांपूर्वी मराठी सिनेमांमध्ये कॅमिओ भूमिका केल्या होत्या;पण आता सोनाली बेंद्रे पुन्हा मराठी सिनेविश्वाकडे वळाली असून, सोशल मीडियावर तिने आगामी मराठी सिनेमाचे पोस्टर शेअर केले आहे. सोनाली बेंद्रे ही अभिनेत्री म्हणून नाही तर सिनेमाची प्रस्तुतकर्ती म्हणून काम करीत आहे. सोनालीने बालकलाकारांच्या भन्नाट अभिनयावर आधारित असलेल्या 'सोहळा' सिनेमाचे पोस्टर इन्स्टाग्रामवर शेअर केले आणि पहिल्याच मराठी सिनेमामध्ये प्रस्तुतकर्ती म्हणून काम करण्याबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. 'सोहळा' सिनेमाचे पोस्टर शेअर करत सोनाली बेंद्रेने लिहिले, "'सोहळा' या खूप खास चित्रपटाचं पहिलं पोस्टर मी शेअर करीत आहे. या सिनेमाच्या माध्यमातून मी पहिल्यांदाच 'फिल्म प्रेझेंटर' (सिनेमा सादरकर्ती) म्हणून काम करतेय. या सिनेमाची गोष्ट ही वय वाढताना आणि मोठे होताना येणारे अनुभव, कुटुंब, स्वप्नं आणि आपल्याला घडवणारे निर्णय यांवर आधारित असणार आहे. 'पश्या' आणि त्याचे जग तुमच्यासमोर आणण्यासाठी मी खूप उत्सुक आहे." 'सोहळा' सिनेमाचे दिग्दर्शन साईकत बागबान यांनी केले असून, निर्मिती गोल्डी बहलसह सचिन श्रीवास्तव, रत्ना श्रीवास्तव व कविता बागबान यांनी केली आहे; तर सिनेमाची प्रेझेंटर अर्था प्रस्तुतकर्ती म्हणून सोनाली बेंद्रे काम करणार आहे. त्याचबरोबर सिनेमाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार १० ऑक्टोबर रोजी 'सोहळा' सिनेमा चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.



# 'महावीर कर्ण' चित्रपटाची घोषणा

नितेश तिवारी यांच्या दिग्दर्शनाखाली बनत असलेल्या 'रामायण'मध्ये अभिनेता रणबीर कपूर भगवान रामांच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाची सध्या अनेकजण आतुरतेने वाट पाहत आहेत. याचदरम्यान, आता दाक्षिणात्य सिनेसृष्टीतून 'महावीर कर्ण' नावाच्या चित्रपटाची घोषणा झाली आहे. सुपरस्टार राघव लॉरेंस 'महावीर कर्ण' चित्रपटात प्रमुख भूमिका साकारणार आहे. नुकतीच राघव लॉरेन्सच्या आगामी 'महावीर कर्ण' या चित्रपटाची पहिली झलक दाखवण्यात आली. चित्रपटातील त्याच्या या लूकला प्रेक्षकांची मोठी पसंती मिळत आहे. 'पेन मूव्हीज' प्रॉडक्शन हाऊसने आपल्या सोशल मीडिया हँडल्सवर या चित्रपटाचा फर्स्ट लूक पोस्टर शेअर केली आहे. सोबतच पोस्टमध्ये म्हंटले की, 'एक चेहरा. एक महान व्यक्ती, एक योद्धा. महावीर कर्णच्या रूपातील राघव लॉरेंसचा फर्स्ट लूक.' या चित्रपटाच्या माध्यमातून अभिनेता राघव लॉरेन्स त्याच्या करिअरमध्ये पहिल्यांदाच एका पौराणिक आणि ऐतिहासिक भूमिकेत दिसणार आहे. कर्ण हा असा योद्धा आहे जो त्याच्या अढळ निष्ठा, दानशूरपणा, सन्मान आणि महान त्यागासाठी ओळखला जातो. त्यामुळे पडद्यावर ही भूमिका साकारणे अभिनेत्यासाठीही एक खूप मोठे पाऊल मानले जात आहे. या चित्रपटाचे एकूण बजेट सुमारे १५० कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. हा चित्रपट तमिळ, तेलगू, मल्याळम, हिंदी आणि कन्नड अशा एकूण पाच प्रमुख भाषांमध्येपॅन इंडिया स्वरुपात बनवला जात आहे. 'महावीर कर्ण' चित्रपट पुढील वर्षापर्यंत चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकतो.

# स्मृतीची विक्रमी 'सुवर्ण'झेप!

## ११ हजार धावांचा टप्पा पार करत रचला नवा वर्ल्ड रेकॉर्ड, जगातील पहिलीच 'महारथी'

**महाईन्यूज | आयची-नागोया**

**आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारतीय महिला क्रिकेट संघाने अंतिम सामन्यात श्रीलंकेचा धुव्वा उडवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे. भारताने यापूर्वी २०२३ च्या आशियाई स्पर्धेतही सुवर्णपदक पटकावले होते. भारताच्या या ऐतिहासिक विजयात आघाडीची फलंदाज स्मृती मानधनाने मोलाचे योगदान दिले.**



शतकाने हुलकावणी दिली असली, तरी स्मृतीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आजवर कोणत्याही महिला फलंदाजाला न जमलेली अद्वितीय कामगिरी करून दाखवली. अंतिम सामन्यात तिने अवघ्या ४५ चेंडूंत ७९ धावांची वादळी खेळी साकारली.

स्मृती मानधनाने भारताचे प्रतिनिधित्व करताना आतापर्यंत ९ कसोटी सामन्यांत २ शतके आणि ५ अर्धशतकांच्या मदतीने ७८८ धावा केल्या आहेत. एकदिवसीय क्रिकेटमध्ये तिने १२० सामन्यांत ५,४११ धावांचा डोंगर उभारला असून, यात १४ शतके आणि ३५ अर्धशतकांचा समावेश आहे. तसेच १७९ आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यांत तिने २ शतके आणि ३७ अर्धशतकांच्या जोरावर ४,८६७ धावा फटकावल्या आहेत.

श्रीलंकेविरुद्ध रंगलेल्या अंतिम लढतीत स्मृती मानधनाने ४५ चेंडूंत ५ चौकार आणि ७ गगनचुंबी षटकारांची आतषबाजी करत ७९ धावांची धडाकेबाज खेळी केली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाने निर्धारित षटकांत २१६ धावांचा डोंगर उभारला होता.

स्मृतीव्यतिरिक्त सलामीवीर शफाली वर्मने ४८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, तर रिचा घोषने पुन्हा एकदा तुफानी फलंदाजी करत अवघ्या २२ चेंडूंत ४९ धावांचे योगदान दिले. भारताने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संपूर्ण संघ अवघ्या ६९ धावांवर गारद झाला. परिणामी, भारताने हा सामना १४७ धावांच्या प्रचंड फरकाने जिंकत दिमाखात सुवर्णपदक पटकावले.

### ११ हजार धावांचा टप्पा पार

स्मृती आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात ११ हजार धावांचा जादुई आकडा गाठणारी जगातील पहिली आणि एकमेव महिला खेळाडू ठरली आहे. तिने मागील सामन्यातच भारताची माजी कर्णधार मिताली राजचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वाधिक धावांचा विक्रम मोडीत काढला होता. मिताली राजने आपल्या कारकिर्दीत १०,८६८ धावा फटकावल्या होत्या. दीर्घकाळापासून मितालीच्या नावावर असलेला हा जागतिक विक्रम मागे टाकत मानधनाने ११ हजार धावांचा नवा टप्पा गाठून इतिहास रचला आहे.

# ना इंग्लंड, ना ऑस्ट्रेलिया; जे टीम इंडियाने केलं ते आजवर कुणालाच नाही जमलं!

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**भारत आणि जपान या दोन्ही संघांमध्ये झालेल्या टी-२० सामन्यात भारतीय संघाने २ धावांनी थरारक विजय मिळवला. दोन्ही संघांमध्ये suzuki cup चा मैत्रीपूर्ण सामना रंगला. या सामन्यात पावसाने हजेरी लावल्याने २० षटकांऐवजी ५-५ षटकांचा सामना खेळवण्यात आला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ३२ धावा केल्या.या धावांचा पाठलाग करताना जपानने ३० धावांपर्यंत मजल मारली.**



यासह भारतीय संघाने हा सामना २ धावांनी आपल्या नावावर केला. यासह श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने एका मोठा रेकॉर्डवर नाव कोरलं आहे.

या सामन्यात भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ५ षटकात ३२ धावा केल्या. यादरम्यान अभिषेक शर्मा शून्यावर बाद झाला. तर संजू सॅमसनने ९ आणि शेवटी श्रेयस अय्यरने १६ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना जपानला ३० धावांपर्यंत मजल मारता आली. भारतीय संघाने हा सामना २ धावांनी आपल्या नावावर केला.

भारतीय संघाने आतापर्यंत खेळलेल्या २९१ सामन्यांपैकी २०० सामन्यांमध्ये विजय मिळवला. दुसऱ्या स्थानी असलेल्या पाकिस्तानने २९९ पैकी १७४ सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. तर तिसऱ्या स्थानी असलेल्या न्यूझीलंडने २६७ सामन्यांमध्ये १३७ सामने जिंकले आहेत. दक्षिण आफ्रिकेच्या नावे २३५ सामन्यांमध्ये १३१ सामने जिंकले आहेत. तर इंग्लंडने २३३ सामन्यांमध्ये १३० सामने जिंकले आहेत.

भारतीय संघाच्या या विजयामुळे टी-२० क्रिकेटमधील भारताच्या सातत्यपूर्ण कामगिरीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. २०० विजयांचा ऐतिहासिक टप्पा गाठताना भारताने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व अधिक भक्कम केले आहे. जपानविरुद्धच्या या सामन्यात कमी धावसंख्या असतानाही भारतीय गोलंदाजांनी संयमी आणि प्रभावी मारा करत सामना शेवटच्या चेंडूपर्यंत रंगतदार ठेवला. पावसामुळे सामना केवळ पाच षटकांचा करण्यात आला असला, तरी दोन्ही संघांच्या खेळाडूंनी उत्साहपूर्ण क्रिकेटचे दर्शन घडवले. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली भारताने अवघ्या दोन धावांनी मिळवलेला हा विजय विशेष ठरला. या सामन्यातील कामगिरीमुळे भारतीय संघाच्या टी-२० क्रिकेटमधील विक्रमी प्रवासात आणखी एका महत्त्वपूर्ण अध्यायाची भर पडली.

### भारतीय संघाचा ऐतिहासिक विजय

हा भारतीय संघाचा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील २०० वा विजय ठरला. यासह भारतीय संघ हा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २०० विजय मिळवणारा पहिलाच संघ ठरला आहे. भारतीय संघाने कसोटी आणि वनडे क्रिकेटच्या तुलनेत चमकदार कामगिरी केली आहे. भारतीय संघाने २००६ मध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळायला सुरूवात केली होती. तेव्हापासून ते आतापर्यंत ३ वेळा टी-२० वर्ल्डकपवर नाव कोरलं आहे. भारतीय संघाने २००७ मध्ये एमएस धोनीच्या नेतृत्वात, २०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वात आणि २०२६ मध्ये सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात खेळताना जेतेपदाचा मान पटकावला होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। बुधवार ।
दि. 23 सप्टेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# मोठ्या थकबाकी मालमत्तांवर ३० सप्टेंबरनंतर कारवाई

## मालमत्ता कर वसुलीबाबत झाली आढावा बैठक; मालमत्ता कराच्या सवलतीसाठी शेवटचे ८ दिवस!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समावेश असणाऱ्या ज्या मालमत्तांवर मोठ्या प्रमाणात मालमत्ता कराची थकबाकी आहे, अशा मालमत्तांवर ३० सप्टेंबर २०२६ नंतर जप्तीची कारवाई करण्यात यावी, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. अशी कारवाई प्राधान्याने औद्योगिक, बिगरनिवासी, मिश्र तसेच इतर मालमत्तांवर करण्यात यावी, असेदेखील ते म्हणाले.**






महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या करवसुलीबाबतची आढावा बैठक आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी ते बोलत होते. बैठकीला अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त सचिन पवार यांच्यासह सर्व प्रशासन अधिकारी तसेच सहायक मंडलाधिकारी उपस्थित होते.

मालमत्ता कर वसुली, मालमत्ता हस्तांतरण, चालू वर्षातील नवीन मालमत्तांची कर आकारणी, थकबाकीदार मालमत्ताधारक तसेच फुगीर मागणी याबाबत विभागनिहाय माहिती बैठकीत घेण्यात आली. करवसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करून वसुलीची कार्यवाही अधिक गतिमान करण्याच्या सूचना आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी दिल्या.

३० सप्टेंबरनंतर थकबाकीदार मालमत्तांवर जप्तीची प्रक्रिया प्रभावीपणे राबवताना प्राधान्याने मोठ्या प्रमाणात मालमत्ता कर थकीत असलेल्या औद्योगिक, बिगरनिवासी, मिश्र तसेच इतर मालमत्तांवर नियमानुसार जप्तीची कारवाई करावी. थकबाकीदार मालमत्ताधारकांकडून कर वसुलीसाठी आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही प्रभावीपणे राबवावी, तसेच विभागनिहाय नियोजन करून करवसुलीची कार्यवाही अधिक गतिमान करावी, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी दिले आहेत.

दरम्यान, शहरातील अनधिकृत बांधकामांवर बारकाईने लक्ष ठेवून नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. नवीन बांधकामांची माहिती संकलित करून पात्र मालमत्तांची कर आकारणी करण्याची कार्यवाही तातडीने करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत असलेल्या मालमत्ता कराची वसुली वाढविण्यासाठी विभागनिहाय नियोजन, थकबाकीदारांचा सातत्याने पाठपुरावा आणि प्रभावी वसुली मोहीम राबविण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

### सवलतीसाठी शेवटचे ८ दिवस

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मालमत्ता करावर ऑनलाइन कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांना सामान्य करात ४ टक्के सवलत जाहीर केली आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी आता शेवटचे ८ दिवस शिल्लक असून ३० सप्टेंबर २०२६ ही सवलत मिळण्याची अंतिम तारीख आहे. आतापर्यंत ५९२ कोटी ७४ लाख मालमत्ता कर संकलित करण्यात आला आहे. त्यामुळे जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी मुदत संपण्यापूर्वी आपला मालमत्ता कर ऑनलाइन भरून ४ टक्के सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ॲड. राजेश उगमसिंग राजपुरोहित यांची महापालिकेच्या विधिज्ञ पॅनेलवर नियुक्ती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. राजेश उगमसिंग राजपुरोहित यांची पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विधिज्ञ पॅनेलवर नियुक्ती करण्यात आली आहे. महापालिकेचे मुख्य विधी सल्लागार ॲड. राजेश आगळे यांच्या स्वाक्षरीने याबाबतचे अधिकृत नियुक्तिपत्र जारी करण्यात आले आहे.**



ॲड. राजपुरोहित यांनी आपल्या कायदेविषयक कारकिर्दीत अनेक महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील प्रकरणे यशस्वीपणे हाताळली आहेत. कायद्याचा सखोल अभ्यास, न्यायालयातील प्रभावी युक्तिवाद, पक्षकारांची बाजू भक्कमपणे मांडण्याची हातोटी आणि कामाप्रती असलेली निष्ठा यांमुळे त्यांनी विधी क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या अनुभवाची आणि कामगिरीची दखल घेत महापालिका प्रशासनाने ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे.

नियुक्ती आदेशानुसार, ॲड. राजपुरोहित हे महापालिकेशी संबंधित विविध कायदेशीर व न्यायालयीन प्रकरणांमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची बाजू मांडणार आहेत. ही नियुक्ती त्यांच्या कायदेविषयक कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे.

विधी क्षेत्रासोबतच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातही ॲड. राजपुरोहित सक्रिय आहेत. त्यांनी भारतीय जनता युवा मोर्चाच्या पिंपरी-चिंचवड शहर विधी आघाडीचे माजी शहराध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. या माध्यमातून त्यांनी विविध सामाजिक आणि कायदेविषयक उपक्रमांमध्ये योगदान दिले आहे.

फौजदारी व दिवाणी प्रकरणे, मालमत्ताविषयक वाद, कौटुंबिक प्रकरणे, धनादेश अनादराची कलम १३८ अंतर्गत प्रकरणे तसेच सायबर कायद्याशी संबंधित विषयांमध्ये त्यांचा विशेष अभ्यास आहे. खरेदीखत, सामंजस्य करार, बक्षीसपत्र, नोंदणीकृत व नोटरीकृत भाडेकरार, मुखत्यारपत्र, मृत्युपत्र आणि वारस प्रमाणपत्र यांसारख्या दस्तऐवजांबाबतही ते कायदेविषयक सेवा देतात.

यासह जुन्या खरेदीखतांच्या मूळ अथवा प्रमाणित प्रती मिळवणे, विविध प्रकारचे करार, नुकसानभरपाई बंधपत्र, संमतीपत्र, सहकारी संस्था आणि ट्रस्ट नोंदणी, महसूल अपील, माहिती अधिकार अर्ज तसेच ईएसआयसी आणि भविष्य निर्वाह निधीशी संबंधित प्रकरणांमध्येही त्यांना अनुभव आहे. ॲड. राजेश उगमसिंग राजपुरोहित यांच्या नियुक्तीचे विधी, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातून स्वागत करण्यात आले आहे. सहकारी, मित्र आणि हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अनधिकृत केबल्स तात्काळ हटवा; आयुक्त यांचा इशारा

## नियमांचे पालन करून महापालिकेस सहकार्य करण्याचे केबल ऑपरेटर्सना आवाहन

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**अनधिकृतपणे टाकण्यात आलेल्या केबल्समुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याबरोबरच शहराच्या सौंदर्यावरही परिणाम होत आहे. त्यामुळे केबल ऑपरेटर्सनी दूरसंचार कायद्यानुसार तसेच महापालिकेच्या नियमांनुसार आवश्यक त्या परवानग्या घेऊनच केबल्स टाकणे गरजेचे आहे. वृक्ष, विद्युत खांब, इमारती, फुटपाथ अथवा इतर अनधिकृत ठिकाणी टाकण्यात आलेल्या केबल्स संबंधित ऑपरेटर्सनी तातडीने हटवाव्यात अन्यथा कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील ओव्हरहेड केबल्सचे नियमन तसेच प्रस्तावित मानक कार्यपद्धती (SOP) संदर्भात केबल ऑपरेटर्सच्या प्रतिनिधींसमवेत पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली, त्यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी बोलत होते.

या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शहर सुधारणा समिती सभापती संजय नाना काटे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, नगरसदस्य कुणाल वाव्हळकर, उत्तम केंदळे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, सह शहर अभियंता अनिल भालसाकळे, महेश कावळे, उप आयुक्त राजेश आगळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह संबंधित विभागांचे उपअभियंता, कर्मचारी तसेच विविध केबल ऑपरेटर कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

शहरातील केबल व्यवस्थेला अधिक नियोजित, सुरक्षित आणि शिस्तबद्ध स्वरूप देण्यासाठी महापालिका प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि केबल ऑपरेटर्स यांच्यात समन्वय साधण्याच्या दृष्टीने बैठकीत विविध बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ओव्हरहेड केबल्समुळे निर्माण होणाऱ्या सुरक्षेच्या समस्या, शहराच्या विद्रूपीकरणाचा प्रश्न, अनधिकृत केबल्सचे नियमन, भूमीगत केबल व्यवस्था आणि त्यासाठी प्रस्तावित मानक कार्यपद्धती याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, शहरातील केबल व्यवस्था अधिक सुरक्षित आणि नियोजित करण्यासाठी सर्व केबल ऑपरेटर्सनी भूमीगत केबल व्यवस्थेचा अवलंब करावा. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे भूमीगत केबल्ससाठी सुमारे ६१० किलोमीटर लांबीचे पाईप्सचे जाळे उपलब्ध असून, या पायाभूत सुविधेचा वापर करून केबल ऑपरेटर्सना भूमीगत केबल व्यवस्था उभारण्यासाठी महापालिकेच्या वतीने अल्पदरात सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. त्यासाठी सर्व केबल ऑपरेटर्सनी अधिकृतपणे अर्ज करावा. पुढील एक वर्षाच्या कालावधीत शहरातील केबल्स भूमीगत करण्याचे महापालिकेचे लक्ष्य असून, हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केबल ऑपरेटर्सचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे आयुक्तांनी नमूद केले. तसेच, ज्या केबल्स बंद आहेत किंवा सध्या वापरात नाहीत, अशा केबल्सदेखील तातडीने हटविण्यात याव्यात. अनधिकृत केबल्स स्वतःहून न हटविल्यास महापालिका प्रशासनाच्या वतीने आवश्यक ती कार्यवाही करून संबंधित केबल्स काढण्यात येतील तसेच आवश्यकतेनुसार त्यांचे कनेक्शन बंद करण्यात येईल, असा इशाराही आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी दिला.

### केबल्ससाठी नवे नियम

उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केबल ऑपरेटर्सही शहराचे नागरिक असून नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी त्यांचीही असल्याचे सांगितले. अनधिकृत केबल्समुळे शहराचे विद्रुपीकरण होत असून, वारंवार सूचना देऊनही त्या न हटविल्यास महापालिका प्रशासनाकडून नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी केबल ऑपरेटर्सनी आवश्यक अधिकृत मान्यता व कागदपत्रांची पूर्तता करूनच केबल्स टाकाव्यात तसेच शहराच्या डिजिटल पायाभूत सुविधा सक्षम ठेवण्यासाठी नियमनाचे पालन करणे आवश्यक असल्याचे नमूद केले. विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी नागरिकांची सुरक्षितता, शहराचे सौंदर्य लक्षात घेऊन अनधिकृत व वापरात नसलेल्या केबल्स हटवण्याची गरज आहे.

# अजितदादांच्या विकासकार्याला गणेशोत्सवातून अनोखी मानवंदना

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या कार्यकाळात झालेल्या विविध विकासकामांचे दर्शन घडविणारा आकर्षक मॉडेलरूपी गणपती देखावा श्री. हरिहर मुरलीधर चौरे(सर) यांच्या देहूगाव निवासस्थानी साकारण्यात आला आहे.**






गणेशोत्सवाच्या निमित्ताने साकारलेल्या या देखाव्यामध्ये श्रीगणेशाच्या मूर्तीसमवेत अजितदादा पवार यांच्या छायाचित्रांचा समावेश करण्यात आला असून, "अजितदादा सदैव स्मरणात... कामाचा माणूस" या भावनेतून त्यांच्या कार्याची आठवण करून देण्यात आली आहे.

अजितदादा पवार यांनी सार्वजनिक जीवनात विविध जबाबदाऱ्या सांभाळताना विकासकामे, पायाभूत सुविधा, शिक्षण, शेती व सहकार, सिंचन व जलसंधारण, आरोग्य, आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांशी संबंधित कामांवर भर दिला. त्यांच्या कार्याची आठवण पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने श्री. हरिहर चौरे व सौ.अश्विनी चौरे यांच्या कुटुंबीयांनी हा देखावा साकारला आहे.

गणेशमूर्ती, आकर्षक विद्युत रोषणाई, फुलांची सजावट आणि अजितदादांच्या कार्याची झलक देणारे मॉडेल यामुळे हा देखावा परिसरातील नागरिकांचे आणि गणेशभक्तांचे लक्ष वेधून घेत आहे.

"अजितदादांनी केलेल्या विकासकामांची आठवण कायम राहावी आणि त्यांच्या कार्याला भावपूर्ण आदरांजली अर्पण व्हावी, या उद्देशाने हा देखावा साकारण्यात आला आहे," अशी भावना प्रा. हरिहर चौरे यांनी व्यक्त केली.

अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती येथे विमान अपघातात निधन झाले होते. त्यांच्या स्मृतींना उजाळा देणारा हा गणेशोत्सवातील उपक्रम सामाजिक आणि भावनिक संदेश देणारा ठरत आहे.

# आरकेएल गॅलेक्सी स्कूल मध्ये आजी-आजोबा दिन उत्साहात

## चिमुकल्यांच्या कलाविष्कारांसह आजी-आजोबांचा उत्स्फूर्त सहभाग

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आरकेएल गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलमध्ये दिनांक १९ सप्टेंबर २०२६ रोजी आजी-आजोबा दिन (Grandparents Day) मोठ्या उत्साहात, प्रेमाने आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या विशेष कार्यक्रमाचे आयोजन पूर्व-प्राथमिक विभाग तसेच इयत्ता १ ली व २ रीच्या विद्यार्थ्यांच्या आजी-आजोबांसाठी करण्यात आले होते.**






कार्यक्रमाचे सर्वात विशेष आकर्षण म्हणजे पूर्व-प्राथमिक विभागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी केलेले सूत्रसंचालन. आत्मविश्वासाने आणि अतिशय सुंदर पद्धतीने त्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, ज्यामुळे उपस्थित आजी-आजोबा भारावून गेले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदनेने झाली. या वेळी उपस्थित आजींनी देवी सरस्वतीचे पूजन करून कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात केली. त्यानंतर पूर्व-प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मधुर स्वागतगीताने सर्व आजी-आजोबांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले.


यानंतर LKG आणि UKGच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच इयत्ता १ ली व २ रीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सुंदर नाटिकेने कार्यक्रमात रंगत आणली. आपल्या लाडक्या नातवंडांचे विविध कलागुण पाहून आजी-आजोबांच्या चेहऱ्यावर आनंद आणि अभिमान स्पष्टपणे दिसून येत होता.

कार्यक्रमातील विशेष आणि अविस्मरणीय क्षण म्हणजे आजी-आजोबांनी स्वतः पुढे येऊन सादर केलेले कलाविष्कार. काही आजी-आजोबांनी सुंदर गाणी गायली, तर काहींनी छोट्या-छोट्या गोष्टी सांगून आपल्या आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण वातावरण अधिक आनंदी आणि उत्साहपूर्ण झाले.

आजी-आजोबांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध मनोरंजक खेळांनी कार्यक्रमात आणखी रंगत भरली. सर्व आजी-आजोबांनी या खेळांचा मनमुराद आनंद घेतला आणि आपल्या नातवंडांसोबत आनंदाचे सुंदर क्षण अनुभवले.

एकूणच, आजी-आजोबा दिनाचा हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी आणि संस्मरणीय ठरला. प्रेम, आपुलकी, आनंद आणि कुटुंबातील पिढ्यांमधील सुंदर नाते यांचा अनुभव देणाऱ्या या कार्यक्रमाने सर्वांच्या मनात अविस्मरणीय आठवणी निर्माण केल्या.

# Little Tummies, Healthy Minds



**Nutrition plays an important role in a preschool child's growth, brain development, energy and behaviour. As parents, we should take extra care of what our little ones eat and build healthy habits from an early age.**

Instead of frequently giving sweets, chocolates and ice creams, encourage fruits, dry fruits, vegetables, milk, soup, eggs and nutritious homemade food. If a child does not like roti-bhaji, make it interesting—blend vegetables into the dough and prepare colourful, nutritious parathas in different shapes. Let healthy food become fun!

We should also guide grandparents and elders at home not to give children everything they demand. Timely meals, healthy food and proper sleep are equally important for a happy and healthy child.

Let us work together—parents, grandparents and teachers—to nurture healthy bodies, happy minds and better habits.

**"Healthy food, healthy mood!"**

**"A healthy child is a happy child."**

**"आज का पौष्टिक आहार, कल का स्वस्थ और मजबूत आधार।"**

By
Archana Bhika
Preschool Teacher
Priyadarshani School, Moshi

# iPhone 18 Pro Series Goes on Sale in India

**MahaEnews I PIMPRI-CHINCHWAD**

**Apple's much-awaited iPhone 18 Pro and iPhone 18 Pro Max have officially gone on sale in India, triggering huge excitement among Apple fans. Long queues were seen outside Apple Stores in several major cities as customers arrived early to get their hands on the latest iPhones.**




Customers began gathering outside stores hours before opening time. In Bengaluru, some buyers reportedly arrived as early as 5 am, while similar scenes were witnessed in Mumbai, Delhi and Noida. The new iPhones went on sale from 8 am on September 18. Considering the rush on launch day, Apple stores opened at 8 am, allowing customers with pre-booked orders as well as walk-in buyers to purchase the new models. The iPhone 18 Pro and iPhone 18 Pro Max are available through Apple's online store and its six official retail stores in India.

The iPhone 18 Pro starts at ₹1,64,900, while the iPhone 18 Pro Max starts at ₹1,79,900 in India. The Pro models are available in storage options ranging from 256GB to 2TB.